Ref. No. UGC/HRDC/2021/14714

UGC-HUMAN RESOURCE DEVELOPMENT CENTRE

**Bhagat Phool Singh Mahila Vishwavidyalaya**

**Khanpur Kalan Sonipat-131305 Haryana**

**Website: https://sites.google.com/view/bpsmvhrdc**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

BPSMV-UGC-HRDC

BPSMV-Human Resource Development Center

# Certificate of Participation

This is to certify that Dr. SUNIL PARISE, Assistant Professor, Department of Music, Shree Ganesh Arts College Kumbhari Akola Maharasta affiliated to S G B University Amravati Maharasta, participated in two weeks online Refresher Course in "Research Methods and Educational Reforms (MD)" from 30 November 2021 to 13 December 2021 organized by UGC-Human Resource Development Centre, Bhagat Phool Singh Mahila Vishwavidyalaya, Khanpur Kalan (Sonipat) and has obtained Grade A.

Dr. Kritika
Course Coordinator

Dr. Shafali Nagpal
Director HRDC

Prof. Rajender Kum[illegible]
Vice Chancellor

Scanned by CamScanner

The Berar General Education Society's

**Sitabai Arts, Commerce & Science College, Akola**

( Re-accredited "A" Grade by NAAC )

&

**Shahir Amar Sheikh Adyasan, Lok Kala Academey**

University of Mumbai, Mumbai

# Certificate

This is to certify that **Dr. Sunil P. Parise** has participated in the One Day National Level Online E-Conference on **"The Role of Music in New National Education Policy"** Organized by Sitabai Arts, Commerce & Science College, Akola. On 26th October 2021. He / She Attended / Presented a paper entitled

| | | |
|---|---|---|
| **Dr. R. D. Sikchi**<br>Principal & Convenor<br>Sitabai Arts, Commerce & Science College, Akola | **Dr. Aniruddha Khare**<br>Head Department of Music<br>Sitabai Arts, Commerce & Science College, Akola | **Dr. Kaumudi Kshirsager (Barde)**<br>Professor Dept. Of Music<br>Sitabai Arts, Commerce & Science College, Akola |

Scanned by CamScanner

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2021

ISSUE No- 328 (CCCXXVIII)

## नवीन शैक्षणिक धोरणात संगीताची भूमिका



**Prof. Virag S. Gawande**
Chief Editor & Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Dr. Kaumudi Dattattry Kshirsagar**
Editor
Department of Music
Sitabai Arts , Commerce
& Science College Akola
Dist.Akola.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

Scanned by CamScanner

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## November -2021

**ISSUE No- 328 (CCCXXVIII)**

# नवीन शैक्षणिक धोरणात संगीताची भूमिका

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Professor. Kaumudi Dattattry Kshirsagar**
**Editor**
Department of Music
Sitabai Arts , Commerce & Science College Akola

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 42 | संगीत और मनुष्य जीवन — प्रा. डॉ. शिरीष कड्डू | 138 |
| 43 | संगीत चिकित्सा अमूल उपहार — प्रा. संतोष किसनराव खंडारे | 141 |
| 44 | मध्यकालीन भक्तकवि सूरदास के काव्य में शास्त्रीय संगीत — प्रो. डॉ. सुरेशकुमार केसवानी | 148 |
| 45 | समाज कल्याण के लिए संगीत की भूमिका — प्रा. नविन आ. खांडेकर | 151 |
| 46 | लोकसंगीताचे महत्व — प्रा.डॉ सुनील पारीसे | 155 |
| 47 | संगीत चिकित्सा : एक स्वास्थ्यवर्धक प्रणाली — प्रा.डॉ.कु. प्रिती. बी. इंगळे (वाकपांजर) | 157 |
| 48 | The Significance of Gharana System in Preserving A Raga — **Dr. Swati Sharma** | 161 |




Scanned by CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 328 (CCCXXVIII)
ISSN : 2278-9308
November, 2021

# लोकसंगीताचे महत्व

प्रा.डॉ सुनील पारीसे
संगीत विभाग प्रमुख श्री.गणेश कला महाविद्यालय कुंभारी ता.जि.अकोला
मो.नं.९४०३८८२३३४ ७०५७६८९५३१
Email ID:parisesunil4545@gmail.com

मानव जन्मापासुन लोक संगीताची उत्पत्ती झालेली असावी असे मानले जाते. भुतलावर मानव अवतरले तेव्हा पासुन मानवाच्या मनातील गीतही उत्पन्न झालेले आहे. जीवन जगत असतांना संगीत ऐकने, गाणे म्हणणे सुरूच असते. बदलत्या प्रवाहा प्रमाणे प्रादेशिक भाषेनुसार लोकसंगीताची पध्दती बदललेली दिसुन येते. अनेक गीत हजारो वर्षापासुन पारंपारीक पध्दतीची असावी. फार थोडया फरकाने त्याची जपवणुक होत असतांना आजही आपल्याला दिसुन येईल. मानव कल्याणासाठी, रंजनासाठी आनंदासाठी, उत्साहासाठी, मनोरंजनासाठी आवश्यक असलेले सामान्यपणे समुह रूपात सादर केले जाणारे संगीत म्हणजे लोकसंगीत, लोकांनी लोकांसाठी गायलेले संगीत म्हणजे लोकसंगीत लोकांना त्यांच्या भाषेतील भाष्य समजावे परंतु अतिशय क्लिष्ट स्वरूप नसलेले संगीत म्हणजे लोकसंगीत, सहज पध्दतीने गाता येईल त्याला लोकसंगीत म्हणावे लागेल अशा अनेक पध्दतीने लोकसंगीताच्या व्याख्या करता येईल.

लोकसंगीतात रितीरिवाजा प्रमाणे सामान्य जनतेच्या मनातील प्रतिबिंब उमटलेले दिसतात. आणि ते सर्व गाण्याच्या रूपाने लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. धार्मिक कार्यामध्ये सुध्दा लोकसंगीताचा वापर योग्य पध्दतीने केल्या जातो. उदा. सण, उत्सव, जन्मोत्सव अशा अनेक धार्मिक विधीमध्ये लोकसंगीताचा वापर सतत होत असतो. संगीत ऐतिहासीक पार्श्वभुमीवर लोकसंगीत कायम भुमिका निभावत असते. देशातील प्रादेशिक प्रदेशामध्ये विविध जाती समुहातील मानव आपल्या हृदयातील भावना लोकसंगीताच्या माध्यमातुन

..२..

संवेदनशिल पध्दतीने स्वाभाविक रूपात आपोआप त्यांच्या मुखातुन प्रकट करीत असतो. त्यावेळी लय आणि स्वर सुध्दा आपोआप प्रकट होत असते. त्यात स्वर, लय शब्दांना एकत्रिंत करून लोकसंगीताचे विकसित रूप स्पष्ट होतांना दिसुन येते

लोकसंगीतात काव्य आणि शब्दांना किंचितच महत्व दिलेले आहे. कुठलीतरी एखादी गोष्ट, कथा स्वर लयीच्या माध्यमातुन मांडण्याची पध्दत दिसुन येते. विशेषतः संपूर्ण कहाणी समुहाने मांडण्याची पध्दत फार प्राचीन काळापासुन सुरू आहे. एकच शब्द विभिन्न स्वराच्या माध्यमातुन वेगवेगळया भावनेतुन मांडल्या जाते. विशेषतः स्वरासाठी शब्द तयार केले जातात. लोकसंगीत गायक भावनिक क्षण ओळखुन स्वाभाविक रूपाने आपले गाणे सादर करत असतो. त्याच्या मनाची एक विशिष्ट अभिव्यक्ती असते. लोकांनी लोकांसाठी तयार केलेली लोक धुन यामध्ये शब्दाची बांधणी करून स्वर लयीच्या माध्यमातुन समुहाने किंवा एकल पध्दतीने लोकसंगीताचे सादरीकरण केल्या जाते.

भारत कृषीप्रदान देश आहे. देशातील असे कोणतेही गांव किंवा खेडे नाही तिथे संगीताचा स्वर गुंजत नसावा. प्रत्येक गावामध्ये संगीताचे स्वर तिथल्या रूढी परंपरेनुसार सांगीतिक परिस्थितीनुसार आवश्यक त्यावेळेस संगीताचे स्वर गुंजत असतात. आणि प्रत्येक प्रादेशिक भाषेनुसार आपआपले लोकगीत सादर होत असतात. उदा. मालवी, निमाडी, गुजराती, राजस्थानी,



Scanned by CamScanner

बुंदेली, छत्तीसगढी, भोजपुरी, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश महाराष्ट्र इत्यादी व अन्य ठिकाणी लोकगीत आपल्या प्रादेशिक भाषेनुसार गात असतात. हिंदू लोकांचे सामाजिक जिवन प्रारंभापासुनच संगीतमय पध्दतीने सुरू होत असते. काही हिंदू जमाती मधील मंगल कार्यात संगीताला मुख्य स्थान दिलेले आहे. जन्मपासुन तर मरणा पर्यतचे सर्व संस्कार संगीतमय पध्दतीने होतांना दिसते. त्याच प्रमाणे घरातील सण, उत्सव, राना वनात, शेतात, नदी नाल्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारे लोकसंगीताची धुन ऐकायला मिळते.

लहान मुला—मुलींचे गीत लय प्रधान असतात. तर महिला पुरूषांचे गित स्वर प्रधान असतात. साधारणतः कथागीत, ऐतिहासिक गीत पुरूष मंडळी गात असतात. काही सामाजिक पध्दतीचे गीत महिला तसेच पुरूष गात असतात. संपूर्ण देशातील प्रदेशामधील लोकगीत ही आपली फार मोलाची संपत्ती आहे. काही लोकगीत अत्यंत मार्मिक व हृदयस्पर्शी आहे. ते परंपरेनुसार पिढया न पिढया चालत आलेली आहे. त्यामूळे बऱ्याच लोकसंगीताचे रचनाकार व संगीतकार कोण आहेत याचा थांग पत्ता सुध्दा लागलेला नाही. लोकसंगीताचे अंतिम लक्षण म्हणजे लोकरूची आहे. सांस्कृतीक, आर्थिक, सामाजिक, भौगोलिक या माध्यमातुन लोकरूचीची निर्मिती होत असते. मानव आपल्या लोकरूची प्रमाणे किंवा उत्पन्न झालेल्या परिस्थितीनुसार आपल्या भाषेत लोकगीत लिहित असतो. व त्यावरील चालीची सुध्दा निर्मिती करीत असतो. त्यामूळे प्रत्येक प्रदेशातील लोकसंगीतात विविधता दिसुन येते.

भारत देशातील बऱ्याच प्रादेशिक भाषेतील लोकगीताच्या चाली मधून किंवा स्वरामधून हिंदी मराठी सिने—संगीताच्या चालीची निर्मिती झालेली असल्याचे जाणवते. तसेच लोकसंगीत शास्त्रीय संगीताची जननी असावी त्यामूळे बऱ्याच शास्त्रीय गायकाने लोकसंगीताच्या स्वरामधून शास्त्रीय राग निर्माण केलेले आहे. किंवा शास्त्रीय संगीताच्या रागाची उत्पत्ती केलेली असावी. अनेक लोक संगीतामधून अनेक ताल वाद्याची निर्मिती सुध्दा झालेली आहे. व ताल ठेक्याची निर्मितीही होतांना दिसुन येत आहे. बऱ्याच शहरात लोकसंगीत गायनाचे जलसे रस्त्यावर, वस्तीमध्ये होतांना दिसतात. पोटाची खळगी भागविण्यासाठी बऱ्याच जाती समुहातील मानव लोकगीत गातांना दिसतात. संपूर्ण परिवाराला सोबत घेवुन किंवा परिसरातील नागरिकांना सोबत घेवुन किंवा व्यक्तीशः लोकांना आवडणारे लोकगीत गातात. बऱ्याच लोकगिताची स्तुती सुध्दा होतांना दिसुन येते.

लोकसंगीत अनेक रूपे घेवुन प्रकट होत असते समुह रूपातुन एकल रूपातुन, मनोरंजनातुन, प्रेरणेतुन, जिवन जगण्याच्या शैलीतुन तसेच लोकनाटयाद्वारे, निसर्गच्या सानिध्यातुन अशा विविध प्रकारे लोकगीत सादर होत असते.

लोकसंगीताची विशेषतः अन्य संगीतापेक्षा खुप विशाल व सौंदर्यात्मक आहे. जीवन आणि संगीत यांच्या घट्ट संबंधाचे वास्तव चित्रण लोकसंगीतातुन पहावयास मिळते. तसेच समुहाने आणि एकल पध्दतीने गायलेली लोकगीते लयबध्द व तालबध्द असतात अनेक लोक गीतात संगीत वाद्याचा वापर होत असतो. उदा. अवनध्द वाद्ये, डमरू, डहाका, ढोल, तासे, खंजेरी, नगाडा, कौंडी, ढोलक, तबला, घनवाद्ये,

घंटा, करताल, झांज, मंजीरा, घुंगरू, चिमटा, काशाची थाळी, ततुवाद्य—तंबुरा, एकतारा, सुषिर वाद्य—हरनाई, बीन, शंख इत्यादी वाद्याची साथ घेवुन लोकगीत गायले जातात. तालवाद्यावर केरवा, दादरा व अन्य ताल वाजविले जातात. या प्रमाणे तत् वितत, सुषिर, आणि घन या चारही प्रकारच्या वाद्याचा प्रयोग लोकसंगीतात होतांना दिसुन येतो.

संदर्भ ग्रंथ :—

१. भारतीय संगीत भाग— १ व २ राम अवतार वीर



Scanned by CamScanner

२. भारतीय संगीत का इतिहास – डॉ.शरदचंद्र परांजपे
३. प्राचीन भारत मे संगीत – डॉ.पुनम मिश्रा
४. संगीत कला विहार (२००८) अ.भा.गा.मंडळ



Scanned by CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

**January 2022, Issue-84, Vol-01**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

# Printing Area

www. विद्यावार्ता® .कॉम

YouTube Channel

Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.

The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).

**If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.**

Indexed

IMPACT FACTOR 7.891 IIJIF

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • ISO9001-2015 CERTIFIED • International Multilingual Research Journal •

http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

39) जैविक उर्वरकों व कीटनाशकों का उपयोग एवं महत्व
**डॉ.शेषमणि विश्वकर्मा, गोला गोकर्णनाथ–खीरी** ||159

40) संगीत कलेत संशोधनाचे महत्व
**प्रा.डॉ सुनील पारीसे, ता.जि.अकोला** ||163

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

५. जैविक उर्वरको का मूल्य कम होता है, जिससे सभी किसान उपयोग में ला सकते हैं।

६. कुछ जैविक उर्वरको एवं कीटनाशकों का निर्माण आसानी से घर पर किया जा सकता है।

७. फसल उत्पादन लागत में कमी आती है, जिससे किसानों की आय में वृद्धि होती है।

८. जैविक उर्वरको के प्रयोग से पर्यावरण की गुणवत्ता बनी रहती है क्योंकि इसके द्वारा मृदा, जल एवं वायु प्रदूषण नहीं होता है।

९. जैविक उर्वरकों के प्रयोग से जैव विविधता में वृद्धि होती है, क्योंकि मृदा में मित्र कीटों एवं सूक्ष्म जीवों की संख्या में वृद्धि होती है।

१०. जैविक उर्वरको के प्रयोग से उत्पादीत खाद्य पदार्थ मानव स्वास्थ्य के लिए लाभकारी होते है

११. जैविक उर्वरकों से रोजगार में वृद्धि होती है, क्योंकि जैविक उर्वरकों के निर्माण, परिवहन एवं विपणन में अनेक किसानों को रोजगार मिलता है।

**सन्दर्भ ग्रन्थ**

१. विश्वकर्मा, एस०एम० (२०१९) : महराजगंज जनपद (उ०प्र०) में कृषि व्यापारीकरण एक भौगोलिक अध्ययन, शोध प्रबन्ध, गोरखपुर विश्वविद्यालय गोरखपुर।

२. तिवारी, आर.सी. एवं सिंह, बी.एन. (२०१०) : कृषि भूगोल, प्रयाग पुस्तक भवन, इलाहाबाद, पृ० २९५

३. कुरूक्षेत्र, ग्रामीण विकास को समर्पित, जैविक खेती, मई २०१९ ,कमरा न० ६५५ सूचना भवन, सी. जी. ओ. काम्पलेक्स, लोधी रोड़ नई दिल्ली।

४. http://hindi.indiawaterportal.org

५. http://m-hindi.idiawaterportal.org

□□□

**40**

# संगीत कलेत संशोधनाचे महत्व

**प्रा.डॉ सुनील पारीसे**
संगीत विभाग प्रमुख,
श्री.गणेश कला महाविद्यालय कुंभारी, ता.जि.अकोला

***********

संगीत कलेबाबत अशी अनेक रूपे आहेत की, त्याकडे संगीत साधकांनी आपले लक्ष वेधने गरजेचे वाटते. कलेचा संपूर्ण विविधांगी विकास होण्यासाठी शोध कार्य अत्यंत आवश्यक आहे. तसेच याचे महत्व पटवून देण्यासाठी समाजात जनजागृती तेवढीच महत्वाची वाटते. मुळातच शोध एक सातत्य क्रिया आहे ज्याचा आधी प्रारंभ तर होईल परंतु अंत नाही कारण शोध ज्ञानाला कोणतीही सीमा नाही. ज्ञानवंताकडून अज्ञात माहिती शोधने याला संशोधन म्हणता येईल. तसेच जुण्या ज्ञानाच्या पृष्ठभुमीचा आधार घेऊन नवे ज्ञान प्राप्त करणे यालाही संशोधन म्हणता येईल. इंग्रजी भाषेत याला Research असे म्हणतात. Re चा अर्थ पुन्हा पुन्हा असा होतो तर search चा अर्थ शोध घेणे असा होतो.

संगीताचे अनेक ग्रंथ आपल्या संगीत तज्ञानी लिहून ठेवलेले आहे. उदा. नाटयशास्त्र ग्रंथात आवाजाचे गुण, नाद, लय, वर्ण, स्थान वीणा या प्रकारे अन्य महत्वपूर्ण गोष्टीवर विवेचन केल्या गेले. तात्पर्य असे की, भारतीय संगीतात संशोधनाची आवश्यकता त्यावेळी सुध्दा होती आणि आजही याची नीतांत गरज आहे. तेव्हाच संगीताचा सर्वासर्वे विकास होईल. यापुर्वी गायन वादन कला गुरूमुखातून ग्रहण करावी लागत होती परंतु नंतर गुरूकुल व्यवस्थेची निर्मिती झाली. गुरूमुखातुन संगीताचे शिक्षण घेवुन अनेक विद्यार्थी आलेले आहे आणि त्याच्याही द्वारे अनेक कलावंत घडल्याचे आपण बघितले आहे. त्यानंतर घराणे शाहीची निर्मिती झाली. घराणे शाहीमूळे संगीताच्या वैशिष्टयांना संरक्षण प्राप्त



Scanned by CamScanner

झाले. एका घराण्या पासुन अनेक नामवंत घराण्याची निर्मिती प्रतीभावंत गायकांनी वादकांनी केली ही निर्मिती करणे म्हणजे एक शोध कार्य करणे होय. यालाही संगीतातील संशोधन म्हणावे लागेल.

आज आपण पाहतो भारतातील अनेक संस्थेमध्ये संगीत शिक्षण प्रणाली सुरू आहे. आणि त्याचा पाठयक्रम सुध्दा तयार झालेला आहे. संगीताचा पाठयक्रम पूर्ण करण्यावर भर सुध्दा देण्यात येत आहे. यामूळे विद्यार्थी संगीताचे ज्ञान घेण्यात मग्न झालेले आहे. संगीत हे क्रियात्मक (प्रॅक्टीकल) विषय असल्यामूळे स्वतःच्या मेहनतीने काही विद्यार्थी उंच शिखर गाठत आहे. काही कलावंत होतांना दिसतात तर काही अध्ययनाचे कार्य जोमाने करीत आहे. काही बंदीश तयार करण्यात काही संगीताचे पुस्तक लिहिण्यात व संगीतामध्ये नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यात लक्ष लागलेले आहे. याच साधकाकडुन नाविण्याचा शोध घेण्याचे कार्य पार पाडतांना दिसत आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये संगीत अध्यापनाचा संपूर्ण लाभ घेवून संशोधनाचे कार्य संगीत साधक करीत आहे. त्यामूळे अनेक समस्यांचे निराकरण तर होईलच परंतु शास्त्रीय संगीत जनमानसात लोकप्रिय होईल. बदलत्या प्रवाहा प्रमाणे संगीतात परिवर्तन होण्यास मदत होईल. संगीत कलेचे वर्तमान व भविष्य काळातील महत्व काय? अशा अनेक विषयावर महाविद्यालयातील संगीत विभागाद्वारे संगीत संस्थेद्वारे चर्चा सत्राचे आयोजन सतत होत असल्यामुळे संगीत अध्यापकांना संगीतातील नवनविन प्रयोग करण्यात स्फूर्ती मिळत आहे. यामूळे नवनविन शोध कार्य संगीताद्वारे होतांना दिसत आहे.

संगीतातील प्राचिन ग्रंथकारांनी अनेक ग्रंथ निर्माण करून ठेवलेले आहे. त्याची उपयोगीता तेव्हाच होईल की त्यावर काहीतरी नाविन्यपूर्ण प्रयोग केल्या जाईल या ग्रंथामूळे संशोधकाला नवदृष्टी मिळेल आणि तर्क शुध्द अध्ययनात रूचि वाढू लागेल. अनेक संगीतकारांनी शास्त्रकारांनी कले समंधी विविधाअंगी अनेक कार्य केलेले आहे त्यावर नजर टाकल्यास काम करण्याची उत्सुकता वाढु लागेल. संगीत कलेचे अस्तीत्व टिकून ठेवण्याची जबाबदारी जशी जुन्या पिढीतील संगीतकारांनी घेतली होती. त्याच प्रमाणे आपलीही तीतकीच जबाबदारी आहे. आणि हीच संगीतातील खूप मोठी शक्ती आहे. ज्या महान संगीत तज्ञांनी संगीत ग्रंथाचे किंवा गायन वादन कलेची संपत्ती त्यावेळी उपलब्ध करून दिली आणि त्यांच्या आधारावर आपण सर्व संगीत अध्यापक कलाकार उंच शिखरापर्यत पोहोचत आहेत. याचे श्रेय आपल्या सर्व ग्रंथकार संगीतकार गुरूजनांना द्यावे लागेल.कारण याचा आधार घेवून लुप्त तथ्य बाहेर काढून त्यांच्या गौरव पूर्ण कलेच्या बाबतीत आपण विचार करणे आणि त्याची जपवणुक आपण करणे हीच काळाची गरज वाटते. संगीतातील सर्व क्षेत्र संशोधनासाठी खुले आहे यातील काही महत्वाच्या टिपनीवर थोडक्यात विवेचन

इतिहासाला साक्ष ठेवून संगीतात संशोधन करणे अगत्याचे आहे. त्यामूळे लुप्त तथ्य आणी गौरवपुर्ण कलेबाबत जाणून घेतल्या जाईल. ऐतिहासिक माहिती करून घेतल्यानंतर आपली सांस्कृतिक सम्पती किती मोलाची आहे याची जाणीव होईल. त्यातील प्राचीन शील्प, ग्रंथ याचाही आधार संधोषकला संशोधन करते वेळी घेता येईल.

प्राचीन काळातील अनेक ग्रंथ आपल्या ऋषिमुनींनी ग्रंथकारांनी, लेखकांनी, संगीत तज्ञांनी, कलावंतानी आपआपल्या भाषेत लिहिलेली आहे. यातील बऱ्याच ग्रंथाचे प्रकाशन झालेले आहे. परंतु कदाचित काही ग्रंथाचे प्रकाशन झालेले नसावे अशा काही ग्रंथाचा शोध घेवून त्यावर संशोधन करावे म्हणजे ज्यांनी ग्रंथ लिहले त्या ग्रंथावर शोध कार्य केल्यास त्याचे ऋण फेडण्याची आपल्याला संधी मिळेल.

१. संस्कृत भाषेतील काही संगीत ग्रंथ असल्यास त्या ग्रंथाचे आपल्या भाषेत अनुवाद करून शोध कार्य करता येईल.

२. प्राचीन ते मध्ययुगीत संगीतातील महान कलावंत तसेच वर्तमान काळातील संगीत कलावंत याच्या सांगितीक जीवनाबदल शोध कार्य करता येईल.

३. संगीतातील एखाद्या विषयावर तुलनात्मक तथा विश्लेषणात्मक अध्ययन करून शोध कार्य करता येईल.

४. काही गेय पदाचे साहित्य उपलब्ध असल्यास त्याचे मुल्यमापन करून त्याला संगीताची जोड देऊन



Scanned by CamScanner

शोध कार्य करता येईल.

५. संगीतातील प्राचीन काळातील लुप्त वाद्य संग्रहीत करून पुनरनिर्मिती करण्याबाबत शोध कार्य करता येईल.

६. संगीतातील कलाकारांनी निर्माण केलेले राग, बंदिश ताल याचा संग्रह करून माहिती संकलन करून शोध कार्य करता येईल.

**संदर्भ ग्रंथ**

१. संगीत एवं शोध प्रविधी — डॉ.मनोरमा शर्मा

२. भारतीय संगीता मे शोध प्रविधी—अलका नागपाल

३. रिसर्च लाईन — (शासकीय) माधव संगीत महाविद्यालय ग्वालियर

४. संगीत शोध अंक १९९०— संगीत कार्यालय हाथरस

❑❑❑



Scanned by CamScanner